सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १८७ | सोमवार, दि. ३० मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. अजितदादा कुंकूलोळ**
राज्य उपाध्यक्ष, व्हॉईस ऑफ मीडिया



**डॉ. पांडुरंग पिंगळे**
सेवाव्रती



**प्रा. एच. टी. बारी सर**
निवृत्त प्राध्यापक



**श्री. नयनेश कामदार**
अमळनेर

## दिनविशेष

३० मार्च

- भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या पेनिसिलिन कारखान्यात स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन केले.
- महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे स्थापन झाले.
- भारतीय फलंदाज वीरेंद्र सेहवागने पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यात ३०९ धावा केल्या आणि त्रिशतक झळकावणारा पहिला भारतीय फलंदाज झाला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

### खानदेशला रेल्वेची मोठी भेट

# दादर-भुसावळ एक्स्प्रेस व्हाया नंदुरबार, अमळनेर आता कायमस्वरूपी धावणार!

## खासदार स्मितताई वाघ यांची माहिती; नोकरदार, विद्यार्थी, व्यापाऱ्यांना आर्थिक दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दादर-भुसावळ (०९०५१/५२) या त्रिसाप्ताहिक विशेष गाडीची वेळोवेळी मुदत वाढवून खानदेशातील जळगावसह धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांतील प्रवाशांची सोय करण्याचा प्रयत्न पश्चिम रेल्वेने आतापर्यंत केला. मात्र, ही गाडी यापुढील काळात कायमस्वरूपी चालविण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार ही गाडी नव्या क्रमांकासह (१९०४७/४८) नियमीत सेवेत समाविष्ट करण्यात येणार असल्याची माहिती खासदार स्मितताई वाघ यांनी दिली आहे.

विशेष गाडी नियमीत झाल्यानंतर दादर-भुसावळ एक्स्प्रेसच्या तिकीट दरात तब्बल २० ते २५ टक्क्यांपर्यंत कपात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे नियमीत प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी तसेच रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. किफायतशीर आणि सुरक्षित प्रवासाचा पर्याय अधिक बळकट होणार आहे. ही गाडी आठवड्यातून तीन दिवस सोमवार, बुधवार आणि शनिवार धावणार असल्याने मुंबई (दादर) ते भुसावळ दरम्यान खानदेशातील विविध स्थानकांना जोडणारी महत्त्वाची वाहतूक साखळी अधिक सक्षम होणार आहे.

विशेषतः मुंबईत नोकरी, शिक्षण किंवा व्यवसायासाठी जाणाऱ्या खानदेशातील नागरिकांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. प्राप्त माहितीनुसार या गाडीला प्रवाशांचा सातत्याने चांगला प्रतिसाद मिळत असल्यामुळेच तिला कायमस्वरूपी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवासी संख्या, मागणी आणि सोयी-सुविधांचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच भविष्यात या गाडीच्या फेऱ्या वाढविण्याचा विचारही रेल्वे प्रशासन करीत आहे.



## कौतुक दै. 'ग्लोबल महातेज'चे...!



**अमळनेर : माहेरची साडी फेम, ज्येष्ठ अभिनेत्री अलकाताई कुबल यांनी रविवार, दि. २९ मार्च रोजी दुपारी बाराच्या सुमारास श्री मंगळग्रह मंदिरास सदिच्छा भेट देऊन श्री मंगळदेवाचे दर्शन व पूजा केली. त्यानंतर निवांत क्षणी दै. 'ग्लोबल महातेज'च्या अंकाचे अवलोकन करीत त्यांनी अंकातील मसाला, मंगल पान, विविध बातम्या व मांडणीचे तोंडभरून कौतुक केले. यावेळी नोबल पोदार लर्न स्कूलच्या चेअरमन सौ. अर्चनाताई सूर्यवंशी व संचालक प्रशांत सूर्यवंशी त्यांच्यासमवेत उपस्थित होते. दरम्यान, अलकाताई कुबल यांनी एका मराठी वाहिनीवरील 'दर्शन' या मालिकेच्या चित्रीकरणाच्या निमित्ताने फेब्रुवारी २०१७ मध्ये श्री मंगळग्रह मंदिराला भेट दिली होती. याही आठवणींना उजाळा मिळाला.** (छायाचित्र : नितेश बारी)



### किरकोळ कारणातून नगरसेवकाला मारहाण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नगरसेवकाला किरकोळ कारणावरून मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अमळनेर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे.प्राप्त माहितीनुसार, अमळनेर येथील नगरसेवक भरत ललवाणी यांना शनिवारी रात्री "माझा भाऊ कुठे होता?" असा प्रश्न विचारण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. हा वाद क्षणातच चिघळत गेला आणि त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. ही घटनाशहरातील लुल्ला मार्केट परिसरात घडली.या घटनेत नगरसेवक ललवाणी यांना धक्काबुक्की करत मारहाण करण्यात आल्याची नोंद आहे. या प्रकरणी मनोज ठाकरे याच्या विरोधात अमळनेर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गांधलीपुरात हसण्यातून गैरसमज; महिलेसह तिघांना मारहाण

### पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भांडी घासत असताना हसण्यातून गैरसमज निर्माण झाला. त्यामुळे चौघांनी महिलेच्या विनयभंगासह इतर तिघांना मारहाण केली. ही घटना मंगळवार, दि. २४ मार्च रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास चुना घाणी परिसरात घडली. या घटनेबाबत पोलिस ठाण्यात मारहाणीसह विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की चुना घाणी परिसरातील महिला व तिची वहिनी घराबाहेर अंगणात भांडी घासत होत्या. यावेळी शेजारील नजराना फरीद खान हिचा गैरसमज झाला की दोघी आपल्यालाच हसत आहेत. त्यावरून तिने संबंधित दोघींना अश्लील शिवीगाळ सुरू केली. तसेच पती फरीद खान मोहम्मद खान यांना फोन करून बोलावून घेतले. त्याचप्रमाणे पुतणे जावेद खान अजीज खान आणि



अमजद खान अजीज खान यांनाही बोलावून घेतले. त्यानंतर हा प्रकार घडला.

**विनयभंगाचा गुन्हा दाखल**

संबंधित महिलांनी घाबरून घराचा दरवाजा लावून घेतला असता नजराना फरीद खान यांच्या नातेवाईकांनी दरवाज्याला लाथ मारून दरवाजा उघडला आणि फरीदने महिलेच्या कानशिलात लगावून तिला खाली पाडले आणि फरीद व अजीज यांनी तिचा ड्रेस फाडून विनयभंग केला, तर अमजदने तिचे पाय धरून बाहेर अंगणात ओढून नेले व चौघांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर नजरानाचे मेहुणे फारुख खान रऊफ खान आले. त्यांनी भांडण आवरायचा प्रयत्न केला आणि नजरानाने अंगणातील दगड उचलून फारुखच्या डोक्यात टाकला. त्यानंतर महिलेचे भाऊ अबू हसन आणि अल्ताफ राजा भांडण आवरायला आले असता त्यांनाही फरीद, जावेद आणि अमजद यांनी मारहाण केली. तसेच जावेदने अबू हसन याच्या हातावर लोखंडी रॉडने मारहाण केली. त्यामुळे पोलिस ठाण्यात मारहाणीसह विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागात कर्मचारी बदल्यांना 'खो'

## संबंधित कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचे कृपाछत्र असल्याची चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





अमळनेर : येथील सार्वजनिक बांधकाम विभागात वर्षानुवर्षे काही कर्मचारी एकाच ठिकाणी नोकरी करीत असल्याचे चित्र आहे. मात्र, वशिलेबाजी अर्थात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कृपाछत्रामुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना वारंवार 'खो' मिळत असल्याचे दिसून आले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अमळनेर, पारोळा, एरंडोल, धरणगाव यांचे उपविभागीय कार्यालय अमळनेर येथे आहे. अमळनेर उपविभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा कार्यकाळ पूर्ण होऊनही त्यांची बदली होत नसल्याचे दिसून येत आहे. या कर्मचाऱ्यांवर कोणाचा वरदहस्त असल्याने त्यांची बदली होत नाही. याबाबत चर्चा अशी आहे, की एका ठिकाणी तीन वर्षांनंतर बदलीसाठी पात्र असताना देखील बदली होत नसल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांचा डोक्यावर हात असल्याचेही सांगण्यात येत आहे. यात सार्वजनिक बांधकाम विभागातील अकाऊंट पे भागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या बऱ्याच वर्षांपासून झालेल्या नाहीत. त्यामुळे अंतर्गत नाराजीही व्यक्त होत असून, या उपविभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर कोणाचे तरी छत्र आहे, अशी चर्चा रंगत आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

अकाउंट पे विभागातील कर्मचाऱ्यांची अमळनेर कार्यालयातील नियुक्ती, त्याचप्रमाणे झालेला कालावधी याचीही चौकशी करून बदलीस पात्र कर्मचाऱ्यांची तत्काळ बदली करण्यात यावी. तसेच एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन कारवाई करावी.

# अमळनेरमध्ये दोन ठिकाणी आग

## पालिकेतील अग्निशमन दलाच्या तत्परतेने टळला अनर्थ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात रेल्वे बोगद्याच्या अलीकडे व विप्रो कंपनीच्या बाजूला दुपारी दोन वाजेच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. मात्र, याबाबत पालिकेकडे माहिती प्राप्त होताच अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचल्याने दोन्ही बंबांनी वेळीच आग आटोक्यात आणली.

रेल्वे रूळांच्या दोन्ही बाजूस असलेल्या मोकळ्या जागांमध्ये तसेच शहरातील रिक्त भूखंडावर काटेरी बाभूळ वाढले आहेत. उन्हाळ्यात ही काटेरी झाडे काढल्याने तेथेच कोरडी होऊन पडलेली असतात. आज कुणीतरी अज्ञात व्यक्तीने कचरा पेटविला असावा किंवा विडी, सिगारेट पिणाऱ्यांनी पेटती काडी फेकली असावी. त्यामुळे दोन्ही ठिकाणी एकाच वेळी आग लागली.



पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी तातडीने अग्निशमन दलाचे प्रमुख गणेश गोसावी यांना घटनास्थळी दोन बंब पाठविण्यास सांगितले. विप्रो कंपनीच्या बाजूला लागलेली आग वाढत चालल्याने विप्रो अधिकारी चिंतेत होते. त्यांनी एका बाजूने पाणी मारणे सुरू केले, तर दुसरीकडे अग्निशमन दलाचे कर्मचारी गोसावी, फारुख शेख, दिनेश बिऱ्हाडे, सत्येन संदानशिव, वसीम पठाण, मच्छिंद्र चौधरी, भिका संदानशिव, आनंदा झिंबल, आकाश संदानशीव, आकाश बाविस्कर यांनी प्रयत्न केल्याने आग विझविण्यात यश आले.

## संपादकीय

# महिला आणखी घेणार उंच भरारी!

भारतीय लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण जवळपास ५० टक्क्यांपर्यंत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संविधानात 'पॉझिटिव्ह डिस्क्रिमिनेशन' किंवा सकारात्मक भेदभावाचे तत्त्व मान्यच केलेले आहे. शोषित, वंचित समुदायाला वर आणण्यासाठी म्हणूनच आरक्षणाच्या तत्त्वाद्वारे या वर्गास झुकते माप दिले जाते. गेल्या काही वर्षांत लोकशाही प्रक्रियेविषयी महिलांमध्ये जागृती निर्माण झाली आहे. पुरुषांपेक्षाही महिलांच्या मतदानाची टक्केवारी वाढली आहे. आता लोकसभेत व विधानसभांमध्ये महिलांना एक तृतीयांश प्रतिनिधित्व देणारे घटना दुरुस्ती विधेयक संसदेच्या चालू अधिवेशनातच मांडण्याच्या हालचाली केंद्र सरकारने सुरू केल्या आहेत. २०११ च्या जनगणनेचा आधार घेऊन २०२९ पासूनच महिला आरक्षण लागू करण्याचा सरकारचा विचार आहे. तसे प्रत्यक्ष घडून आल्यास देशातील समस्त महिलावर्ग त्याचे स्वागतच करेल आणि पुरुषांनीही त्यांच्या आनंदात सामील व्हावे, अशी अपेक्षा आहे; परंतु त्यासाठी सरकार आणि विरोधी पक्ष यांना एकत्र येऊन वेगाने पावले टाकावी लागतील. संसदेत सतत आरोप-प्रत्यारोप, आदळआपट, घोषणाबाजी आणि सभात्याग असे सर्व काही घडत असते. त्यातून वेळ काढून महिला आरक्षणाचे विधेयक पुढे रेटावे लागेल. अगोदर देशाच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेचे मतदारसंघ वाढवण्याचा विचार सुरू आहे. या दृष्टीने आखलेल्या योजनेनुसार लोकसभेची सदस्य संख्या विद्यमान ५४६ वरून ८१६ वर नेऊन त्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची योजना आहे. महिला आरक्षण विधेयक हे २०२३ मध्येच संसदेत संमत केले होते; परंतु आता नवीन जनगणना सुरू होणार असून, त्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रतीक्षा करण्याची केंद्र सरकारची तयारी नाही. कारण नवी जनगणना ही २०२७ नंतर पूर्ण होणार आहे. त्यानंतरच मतदारसंघाच्या फेररचनेचे काम हाती घेतले जाईल आणि ही प्रक्रिया २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता नाही.

२०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत हे आरक्षण लागू होणे शक्यच नव्हते. कारण विधेयकाच्या मसुद्यानुसार कायदा लागू झाल्यावर जनगणना आणि मतदारसघांची फेररचना झाल्यावरच राखीव जागांचे प्रमाण निश्चित होणार होते. खरेतर २०२१ मध्ये जनगणना प्रस्तावित होती; परंतु ती सुरूच झालेली नाही. गेल्यावेळी हे विधेयक मांडताना तत्कालीन कायदामंत्री अर्जुन मेघवाल म्हणाले की, यात १५ वर्षे आरक्षणाची तरतूद असून, त्यात वाढ करण्याचा अधिकार संसदेला आहे. महिला आरक्षण विधेयक सर्वसंमतीने पारित करावे. महिलांना आपण जेवढ्या सुविधा देऊ, तेवढ्या आपल्या माता-भगिनी व मुली स्वसामर्थ्याचे दर्शन घडवतील, असे उद्गार मोदी यांनी त्यावेळी काढले होते. लोकसभा निवडणुकीनंतर अस्तित्वात आलेल्या नव्या संसदेत हा कायदा आता लवकरात लवकर संमत होऊन २०२९ च्या निवडणुकांमध्येच आरक्षण लागू व्हावे, यासाठी एनडीए सरकार विरोधी पक्षांची मनधरणी करत आहे; परंतु हे आरक्षण लागू करण्यासाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घ्यावा लागेल. या प्रस्तावामुळे नवीन जनगणना आणि मतदारसंघ फेररचना या दोन्ही अटी टळून महिला आरक्षण लागू करण्याचा मार्ग प्रशस्त होऊ शकतो. अर्थात, हे करताना एनडीएने राजकीय लाभाचाच विचार केलेला आहे. २०२४ मध्ये एनडीए व भाजपच्याही जागा कमी झाल्या होत्या. सलग तीन टर्म्सनंतर अँटिइन्कम्बन्सीची लाट येऊ शकते; परंतु २०१९ व २०२४ मधील लोकसभा निवडणुका आणि गेल्या पाच-सहा वर्षांत झालेल्या विधानसभा निवडणुकांत भाजप व मित्रपक्षांना मतदान करणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढल्याचे दिसून आले. त्यातून सरकारच्या आराखड्यानुसार लोकसभेची एकूण सदस्य संख्या ८१६ होणार असून, त्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतील. याचा अर्थ, प्रत्येक तिसरा लोकसभा मतदारसंघ महिलांसाठी राखीव असणार आहे.

सध्या लोकसभेत महिलांचे प्रतिनिधित्व जवळपास १५ टक्के आहे; परंतु या घटनात्मक दुरुस्तीसाठी केंद्र सरकारला लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांत दोन तृतीयांश बहुमताची गरज आहे. भाजपकडे स्वतंत्रपणे आवश्यक बहुमत नसल्यामुळे या विधेयकासाठी सर्वपक्षीय सहमतीची गरज भासणार आहे. विरोधी पक्षांचे सहकार्य आवश्यक असतानाच त्यांच्याशी संवाद ठेवायचा आणि अन्य वेळी मात्र त्यांच्या रास्त मागण्यांचीही दखल घ्यायची नाही, असे सत्ताधारी पक्षाने करू नये. शिवाय एकीकडे महिला आरक्षण विधेयक आणायचे आणि दुसरीकडे त्यांच्याबाबत अनुदार दृष्टिकोन बाळगायचा, हेही योग्य नाही. पहलगाममध्ये २२ एप्रिल २०२५ रोजी दहशतवादी हल्ला झाला. त्यावेळी भाजपचे खासदार रामचंदर जांगरा यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. 'पहलगाममधील हल्ल्याचे लक्ष्य ठरलेल्या महिला या वीरांगना नव्हत्या. तशा असत्या तर त्या अहिल्याबाई होळकर किंवा राणी लक्ष्मीबाईप्रमाणे अतिरेक्यांबरोबर लढल्या असत्या', असे उद्गार जांगरा यांनी काढले होते. त्या महिलांचे आप्तेष्ट गोळ्यांना बळी पडले, त्याबाबत सहानुभूती न बाळगता जांगरा यांनी याप्रकारचे वक्तव्य केले. आज महाराष्ट्रासारख्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ५० टक्के महिला आरक्षणामुळे १४ हजार महिला सरपंच, १७५ पंचायत समिती सदस्या आणि १७ जिल्हा परिषद अध्यक्षा निवडून येत आहेत. अनेक शहरांत महिला महापौर उत्तम काम करत आहेत. जिल्हा पातळीपर्यंत तडफदार कामगिरी बजावणाऱ्या या महिलांना संसदेत व विधानसभेत अधिक प्रतिनिधित्व मिळाल्यास समाजाच्या दृष्टीने चांगलाच फायदा आहे. पुरुषप्रधान वर्चस्व हळूहळू मोडीत निघत असून, स्त्रियांमध्येही पुरुषप्रधान वर्चस्वाची मानसिकता खोलवर रुजलेली आहे. ही पाळेमुळे उखडून टाकण्यासाठी संघर्ष करावा लागेल. सत्तेतील सहभाग वाढल्यानंतर महिलांचा आत्मविश्वासही वाढेल आणि त्या 'उंच माझा झोका गं' म्हणत अधिक उंच भरारी घेऊ शकतील.

# ३१ मार्चच्या आधी 'ही' कामे करून घ्या, अन्यथा येणार पश्चातापाची वेळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

३१ मार्च २०२६ ही आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची अंतिम तारीख ठरणार आहे. कारण १ एप्रिलपासून विविध आर्थिक आणि करसंबंधित नियमांमध्ये बदल होणार आहेत. त्याचा थेट परिणाम तुमच्या बँक खात्यांवर, गुंतवणुकीवर आणि टॅक्स सवलतींवर होणार आहे. त्यामुळे वेळ न दवडता काही महत्त्वाची आर्थिक कामे या तारखेपूर्वी पूर्ण करणे गरजेचे आहे. अन्यथा काही खात्ये निष्क्रिय होऊ शकतात किंवा कर सवलतींचा लाभही मिळणार नाही.

**१ एप्रिलपासून बदलणार नियम**

नवीन आर्थिक वर्ष सुरू होताच पीएफ, सुकन्या समृद्धी योजना, एनपीएस आणि आयकर नियमांमध्ये बदल अपेक्षित आहेत. त्यामुळे ३१ मार्चपूर्वी आवश्यक व्यवहार पूर्ण केल्यास खाते सक्रिय राहील, कर बचत होईल आणि दंड टाळता येईल. विशेषतः ज्यांचे पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंकिंग झालेले नाही किंवा ज्यांच्यावर कर्ज आहे, त्यांनी तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे.

**पीएफ आणि सुकन्या समृद्धी खाते सक्रिय ठेवा**

प्रॉव्हिडंट फंड खात्यात किमान ५०० रुपये आणि सुकन्या समृद्धी योजना खात्यात किमान २५० रुपये जमा करणे बंधनकारक आहे. हे व्यवहार ३१ मार्चपूर्वी पूर्ण न केल्यास खाते निष्क्रिय होऊ शकते. विशेषतः मुलींच्या भविष्यासाठी असलेली ही योजना सुरू ठेवण्यासाठी




वेळेत रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

**एनपीएसमध्ये गुंतवणूक करा**

नॅशनल पेन्शन स्कीम अंतर्गत टियर-१ खाते सक्रिय ठेवण्यासाठी किमान १,००० रुपयांची गुंतवणूक आवश्यक आहे. यामुळे आयकर कायद्याच्या कलम ८० सीडी (१बी) अंतर्गत ५० हजार रुपयांपर्यंत अतिरिक्त कर सवलत मिळू शकते. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही गुंतवणूक केल्यास दुहेरी फायदा मिळतो.

**पॅन-आधार लिंकिंग आणि केवायसी पूर्ण करा**

पॅन कार्डला आधारशी लिंक करणे आता अत्यावश्यक झाले आहे. अनेक बँकिंग, शेअर बाजार आणि कर व्यवहारांसाठी हे बंधनकारक आहे. तसेच प्रलंबित केवायसी प्रक्रिया आणि मागील वर्षाचे सुधारित आयकर विवरणपत्र (आयटीआर) देखील ३१ मार्चपूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा व्यवहार अडकण्याची शक्यता आहे.

***८० सी अंतर्गत कर बचत गुंतवणूक***

जुनी करप्रणाली निवडणाऱ्यांसाठी १.५ लाख रुपयांपर्यंत कर सवलत मिळविण्याची ही शेवटची संधी आहे. यासाठी एलआयसी पॉलिसी, ईएलएसएस म्युच्युअल फंड, ५ वर्षांची फिक्स डिपॉझिट किंवा मुलांच्या शाळेची फी यामध्ये गुंतवणूक करता येते. ३१ मार्चनंतर या आर्थिक वर्षासाठी ही सवलत लागू होणार नाही.

**होम लोनवर सवलत मिळवा**

घरकर्ज घेतलेल्या व्यक्तींनी ३१ मार्चपूर्वी मुद्दल रक्कम भरल्यास आयकर कलम ८० सी अंतर्गत सवलत मिळू शकते. याशिवाय व्याजावरही वेगळी कर सवलत मिळते. त्यामुळे बँकेत संपर्क साधून हप्ते वेळेवर भरणे फायद्याचे ठरते.

# 'ई-केवायसी'तील चुकीच्या दुरुस्तीसाठी लाडक्या बहिणींना ३१ मार्चपर्यंतच संधी

## ऑनलाईन सुविधेने दिलासा; तांत्रिक चुकांमुळे प्रक्रिया अर्धवट राहिल्याने लाभार्थींच्या संख्येत घट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत 'ई-केवायसी' करण्यात अनेकांकडून चुका घडलेल्या आहेत. त्यामुळे या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाकडून ३१ मार्च २०२६ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत अंगणवाडी केंद्र किंवा ऑनलाईन पोर्टलवरून चुकीची दुरुस्ती न केल्यास १५०० रुपये मासिक हप्ता कायमचा बंद होऊ शकतो. तसेच दुसरीकडे मात्र निकषांमध्ये अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येत आहे.

**ऑक्टोबरचा हप्ता नोव्हेंबरमध्ये**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत दिला जाणारा १५०० रुपये ऑक्टोबरचा हप्ता नोव्हेंबरमध्ये बँक खात्यात जमा करण्यात आलेला आहे.

**या चुकांमुळे बंद झाला होता लाभ**

ई-केवायसी प्रक्रियेत तांत्रिक दोष व विविध चुका झाल्यामुळे महिलांना लाभापासून वंचित राहावे लागले. आता ही शेवटची संधी समजून ई-केवायसी प्रक्रिया व्यवस्थितपणे पूर्ण केल्यास बंद झालेले हप्ते सरकारकडून पुन्हा सुरू केले जाऊ शकतात. महिलांच्या आधार कार्डावरील नाव आणि बँक पासबुकवरील नाव यामध्ये तफावत असल्याने हप्ते रखडले होते. ३१ मार्च २०२६ च्या अगोदर ही दुरुस्ती केल्यास थकीत हप्त्यांसह पुढील सर्व लाभ खात्यात जमा होणार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले

### कोणाला मिळणार दुरुस्तीची संधी?

- ज्या महिलांचे अर्ज मंजूर आहेत, पण खात्यात एकही रुपया जमा झालेला नाही.
- ज्यांच्या बँक खात्याच्या माहितीत त्रुटी आहेत.
- ज्यांचे बँक खाते डीबीटीसाठी लिंक किंवा सक्रिय नाही. अशा लाभार्थी महिलांना अर्ज दुरुस्तीची संधी आहे.

**फेब्रुवारीचा हप्ता लवकरच जमा होणार**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिला व बालविकास विभागाकडून चालविली जाते. या योजनेतून दरमहा महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा केले जातात. जानेवारी महिन्याचा हप्ता गेल्या २३ फेब्रुवारीला वितरित करण्यात आला. आता लवकरच फेब्रुवारीचा हप्ता जमा होणार आहे.

**अशी घ्या काळजी**

ई-केवायसी करताना लाभार्थी महिलांनी सर्व माहिती अचूक व योग्यरीत्या भरावी. आधार कार्ड व बँकेच्या तपशिलाची योग्य पद्धतीने पडताळणी करून घ्यावी. उत्पन्न, वैवाहिक स्थिती आदींबाबतचा योग्य पर्याय निवडावा आणि ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी एकदा तपासून सर्व माहिती बरोबर भरली गेल्याची खात्री पटवून घ्यावी. दरम्यान, थकीत हप्ते कधी मिळणार याकडे राज्यातील महिलांचे लक्ष लागले होते. त्यावर सामाजिक न्याय विभागाकडून २७७ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याने येत्या काही दिवसांत फेब्रुवारीच्या हप्त्याची रक्कम लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होऊ शकते.



# महाराष्ट्राचा राज्यपक्षी हरियल

**ग्लोबल महातेज वृत्तसेव**

**पक्ष्यांची ओळख**

**नाव :** राज्यपक्षी हरियल (Green Pigeon)
**रंग :** हरियल हिरवा असून पाय पिवळे असतात. अज्ञानातून याला पोपट समजले जाते.
**चोच :** राखाडी, मध्यम आकाराची पण मजबूत.
**डोळे :** राखाडी रंगाचे असून डोळ्याभोवती गुलाबी वर्तुळ असते.
**घरटे :** हा पक्षी वड, पिंपळ, उंबर अशा उंच झाडावर राहतो. इतर कबुतरांप्रमाणे जमिनीवर शक्यतो उतरत नाही. काड्या, पाने यापासून घरटे बनवितो. नर काड्या गोळा करून आणतो व मादी त्या काड्यांची सुबक मांडणी करून घरटे बनविते.
**अंडी :** एप्रिल, मे महिन्यात मादी दोन अंडी घालते. ते पांढरे शुभ्र असतात.
**भक्ष :** हा फलाहारी पक्षी आहे. तो वड, पिपळाची व जंगलातील झाडांची फळ खातो.
**आवाज :** मधूर, शिटी वाजविल्याप्रमाणे ध्वनी ऐकू येतो.
**इतर वैशिष्ट्ये :** हरियल हा महाराष्ट्राचा राज्यपक्षी आहे. हिरव्या रंगामुळे चटकन दृष्टीस पडत नाही. एकटा न राहता थव्यात राहतो. भारतभर आढळतो. अमळनेरला डॉ. बहुगुणे हॉस्पिटलच्या मागील झाडांवर, प्रताप तत्त्वज्ञान केंद्राच्या झाडीत दिसतो.

**संग्राहक : प्रा. प्रकाश** धर्माधिकारी
निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.

# ट्रोल करणाऱ्यांना आरती सिंहचे सडेतोड उत्तर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दूरचित्रवाणी अभिनेत्री आरती सिंह तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. सध्या ती पती दीपक चौहानसोबत थायलंडमध्ये सुटीचा आनंद घेत असून तेथील फोटो सोशल मीडियावर शेअर करत आहे.

तिने इन्स्टाग्रामवर बिकिनीमधील काही फोटो शेअर केले होते. या फोटोंवरून सोशल मीडिया यूजर्सनी तिला ट्रोल करण्यास सुरूवात केली. मात्र ट्रोल करणाऱ्यांना आरतीने सडेतोड उत्तर दिले. उत्तर सुरूवातीला तिने ट्रोलिंगमुळे ते फोटो हटवले होते. पण काही काळानंतर तिने पुन्हा गुलाबी बिकिनीमधील फोटो शेअर करत आपली भूमिका मांडली.

तिने पोस्टमध्ये लिहिली, की माझे आयुष्य, माझे नियम, माझे शरीर आहे आणि कपडे घालण्याचा निर्णयही माझाच असेल. आपण सतत विचार करतो की लोक काय म्हणतील, पण एक दिवस असा येतो की आपल्याला जाणवतं आपल्याला जे मनापासून करायचं होतं, तेच करायला हवं होत. ज्यांच्याबद्दल आपण विचार करतो ते आपल्याला ओळखतही नसतात. मागच्या वेळी जेव्हा मी बिकिनी फोटो पोस्ट केले तेव्हा काही लोकांनी मला अनफॉलो केले. त्याचा माझ्यावर परिणाम झाला आणि मी फोटो डिलीट केले. पण काही दिवसांपूर्वी माझी जिवलग मैत्रीण शेफाली हिचे निधन झाले. तेव्हा मला जाणवले की आयुष्य किती अनिश्चित आहे. आपण जे आपल्याला खरोखर आनंद देते, ते का करू नये? तिने ट्रोलर्सना उद्देशून स्पष्ट शब्दांत म्हटले, की मी कोणालाही दुखावत नाही. तुम्हाला माझे फोटो आवडत नसतील तर तुम्ही मला अनफॉलो करू शकता. कमेंटमध्ये काहीही लिहिले तरी त्यातून तुमचे संस्कार दिसतात. जे लोक मला खरोखर प्रेम करतात ते मला जशी आहे तशी स्वीकारतील.

# सनरायजर्स एका चुकीमुळे हारले; ८ व्या ओव्हरला फिरली मॅच

## आरसीबीच्या विराट, पडिक्कलने 'आयपीएल'मध्ये रचला इतिहास, ठरला नंबर वनचा संघ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयपीएल-२०२६ स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू अर्थात आरसीबी संघाने सनरायजर्स हैदराबादवर सहा विकेटने विजय मिळविला. या सामन्यात आरसीबीने फक्त विजयच नाही तर आयपीएलच्या इतिहासामधील सर्वांत वेगवान २०० धावांचे लक्ष्य पूर्ण केले आहे. आरसीबीने राजस्थानचा रेकॉर्ड एका चेंडूने मोडला आहे. आरसीबीच्या या विक्रमी कामगिरीसह त्यांनी सीझनमधील पहिला विजय मिळवत एकदम चांगली सुरूवात केली आहे. तर चाहत्यांना विराट कोहलीची नाबाद ६९ धावांची अर्धशतकी खेळीसुद्धा पाहायला मिळाली.

सनरायजर्स हैदराबाद संघाने २० ओव्हरमध्ये ९ गडी बाद २०१ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना आरसीबीने १५.४ ओव्हरमध्ये ते पूर्ण केले. आयपीएल इतिहासामध्ये वेगवान २०० धावांचे आव्हान पूर्ण करणारा पहिला संघ ठरला आहे. या आधी हा विक्रम राजस्थान रॉयल्सच्या नावावर होता. राजस्थान संघाने गुजरातविरुद्ध २०२५ मध्ये १५.५, आरसीबीनेही गुजरातविरुद्धच २०२४ मध्ये १६ ओव्हरमध्ये २०० धावांचे आव्हान पूर्ण करत विक्रम रचला होता. आरसीबीने आता राजस्थानला मागे टाकले आहे.

चिन्नस्वामी स्टेडियमवर ही लढत झाली. लक्ष्याचा पाठलाग करताना फिल सॉल्ट (८) झटपट माघारी परतला. यानंतर कोहली आणि पडिक्कलने डावाची सूत्रे हाती घेतली. या जोडीने 'हैदराबाद'च्या कमकुवत गोलंदाजीवर पॉवरप्लेमध्ये जोरदार प्रहार केला. सुरूवातीला पडिक्कलने फटकेबाजी केली. कोहली-पडिक्कल जोडीने ४५ चेंडूंत १०१ धावा करून विजयाचा पाया रचला. या जोडीने ४५ चेंडूंत १०१ धावा करून विजयाचा पाया रचला. पडिक्कल २६ चेंडूंत सात चौकार व चार षटकारांसह ६१ धावा करून बाद झाला. यानंतर कोहलीने कर्णधार रजत




पाटीदारच्या साथीने तिसऱ्या विकेटसाठी २२ चेंडूंत झटपट ५३ धावा केल्या. पाटीदारने १२ चेंडूंत तीन षटकार व दोन चौकारांसह ३१ धावा केल्या. पाटीदार आणि जितेश-शर्मा (०) बाद झाल्यानंतर कोहलीने टीम डेव्हिडच्या साथीने १९ चेंडूंत ४० धावांची अभेद्य भागीदारी रचून २६ चेंडू राखून 'बेंगळुरू'ला विजय मिळवून दिला. कोहलीने ३८ चेंडूंत पाच चौकार व पाच षटकारांसह नाबाद ६९ धावा केल्या. कोहलीने १६ व्या



षटकात हर्षल पटेलला सलग ६, ४, ४, ४ धावा फटकारल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना कोहलीने आयपीएलमध्ये चार हजार धावा पूर्ण केल्या. अशी कामगिरी करणारा तो पहिलाच फलंदाज ठरला.

बेंगळुरू संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. जेकब डफीने 'बेंगळुरू'ला जबरदस्त सुरूवात मिळवून दिली. त्याने तिसऱ्या षटकात अभिषेक शर्मा (७) आणि ट्रेव्हिस हेड (११) या धोकादायक फलंदाजांना माघारी पाठविले. यानंतर डफीने आपल्या पुढच्या षटकात नितीशकुमार रेड्डीचाही (१) अडसर दूर केला. यावेळी 'हैदराबाद'ची ४.२ षटकांत ३ बाद २९ अशी स्थिती झाली होती. पॉवरप्लेच्या पहिल्या सहा षटकांत 'हैदराबाद'ने ३ बाद ४९ धावा केल्या होत्या. अर्थात, याचा परिणाम ईशान किशनच्या फलंदाजीवर झाला नाही. त्याने हेन्री क्लासेनच्या साथीने चौथ्या विकेटसाठी ५३ चेंडूंत ९७ धावांची भागीदारी रचली. ईशान किशनने आपली लय कामय राखली. ईशानने मोठा फटका खेळला होता त्यावेळी साल्ट याने अफलातून झेल घेत त्याला ८० धावांवर त्याला माघारी पाठविले. अनिकेत वर्माने ४३ धावांची तोडफोड बॅटींग केली. त्यामुळे हैदराबाद २०० धावांचा टप्पा पार करू शकले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




# आधुनिक मराठी साहित्यातील प्रखर आवाज : वसंत आबाजी डहाके

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी साहित्यविश्वात आपल्या वैचारिक, प्रयोगशील आणि प्रभावी लेखनाने स्वतंत्र ओळख निर्माण करणारे वसंत आबाजी डहाके हे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या साहित्यिक योगदानाचा वेध घेणे म्हणजे आधुनिक मराठी साहित्याच्या प्रवाहाचा अभ्यास करण्यासारखे आहे.



**प्रारंभिक जीवन व साहित्यप्रवेश**

वसंत आबाजी डहाके यांचा जन्म विदर्भातील सामाजिक-सांस्कृतिक वातावरणात झाला. बालपणापासूनच त्यांना वाचनाची आवड होती आणि याच आवडीने पुढे त्यांना लेखनाकडे वळवले. त्यांनी केवळ कविता नव्हे तर कथा, कादंबरी, समीक्षा आणि भाषांतर या विविध साहित्यप्रकारांतही उल्लेखनीय काम केले आहे.

**साहित्य वैशिष्ट्ये**

डहाके यांच्या लेखनाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील नवीन प्रयोगशीलता आणि सामाजिक भान. त्यांच्या कवितांमध्ये आधुनिक जीवनातील विसंगती, व्यक्तीचे एकाकीपण, बदलती मूल्यव्यवस्था आणि अस्तित्ववादी विचार प्रकर्षाने दिसून येतात.

**प्रयोगशील भाषा आणि शैली**

पारंपरिक चौकटी मोडून नवे अभिव्यक्तीचे मार्ग त्यांनी शोधले.

**सामाजिक वास्तवाचे चित्रण**

समाजातील बदल, संघर्ष आणि विषमता यांचे प्रभावी दर्शन घडते.

**बौद्धिक गहनता**

त्यांच्या लिखाणात तत्त्वज्ञान आणि चिंतनशीलता जाणवते.

**प्रमुख साहित्यकृती**

त्यांच्या कवितासंग्रहांनी मराठी कवितेला नवे वळण दिले. आधुनिकतेच्या प्रभावाखाली त्यांनी मानवी मनाच्या सूक्ष्म छटा शब्दबद्ध केल्या. त्यांच्या लेखनात केवळ भावना नाहीत, तर विचारांची धारही तितकीच तीक्ष्ण आहे.

**पुरस्कार व सन्मान**

मराठी साहित्यातील योगदानाबद्दल वसंत आबाजी डहाके यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या साहित्याची दखल केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावरही घेतली गेली आहे. त्यांच्या लेखनाने अनेक नवोदित लेखकांना प्रेरणा दिली आहे.

**आधुनिक संदर्भातील महत्त्व**

आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनात डहाके यांच्या कविता माणसाला अंतर्मुख करतात. त्यांच्या लेखनातून माणूस, समाज आणि नातेसंबंध यांचा सखोल विचार करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळेच त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन आणि आवश्यक वाटते. वसंत आबाजी डहाके हे केवळ कवी किंवा लेखक नसून ते एक विचारवंत आहेत. ज्यांनी मराठी साहित्याला नवी दिशा दिली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करणे म्हणजे मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेचा सन्मान करणे होय. त्यांचे साहित्य वाचकांना केवळ शब्दांचा आनंद देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टीही देते हेच त्यांच्या लेखनाचे खरे यश आहे.

# अनन्या पांडे स्टाइल, फॅशनमुळे चर्चेत!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे पुन्हा एकदा तिच्या स्टाइल आणि फॅशनमुळे चर्चेत आली आहे. मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या एका फॅशन वीकमध्ये अनन्याने रॅम्प वॉक करत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. तिचा हटके लूक आणि आत्मविश्वासपूर्ण अंदाज सध्या सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आहे. या फॅशन शोमध्ये अनन्याने प्रसिद्ध डिझायनर राहुल मिश्रा यांच्या डिझाईनसाठी रॅम्प वॉक केला. यावेळी तिने आयव्हरी रंगाची प्लीटेड स्कर्ट आणि ब्राइट ओव्हरसाईज कोट असा आकर्षक पोशाख परिधान केला होता. या ड्रेसमध्ये ती खूपच सुंदर आणि एलिगेट दिसत होती.

अनन्याच्या या लूकमध्ये तिची हेअरस्टाईलही विशेष ठरली. तिने बॅंग्स स्टाईलमध्ये केस ठेवले होते. ज्यामुळे तिचा लूक आणखी वेगळा आणि स्टायलिश दिसत होता. तिच्या या फॅशन सैन्समुळे उपस्थितांकडून आणि चाहत्यांकडून तिचे भरभरून कौतुक करण्यात आले. रॅम्प वॉकनंतर अनन्याने माध्यमांशी संवाद साधताना तिचा फॅशन मंत्रा सांगितला. ती म्हणाली, की मला नेहमी आरामदायक आणि क्लासी कपडे घालायला आवडतात. तसेच, तिने राहुल मिश्रा यांच्या डिझाईनचीही प्रशंसा केली. त्याच्या प्रत्येक ड्रेसमध्ये एक कथा असते आणि त्या कथेचा भाग बनायला मला आवडते, असेही ती म्हणाली.

या कार्यक्रमात अनन्याला पाठिंबा देण्यासाठी तिची आई भावना पांडेही उपस्थित होती. आई-मुलीच्या या खास उपस्थितीने कार्यक्रमात अधिक रंगत आली. कामाच्या बाबतीत बोलायचे झाले, तर अनन्या पांडे अलीकडे 'तू मेरी मैं तेरा' या चित्रपटात दिसली होती. मात्र, हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर विशेष चालला नाही. आता ती लवकरच चांद मेरा दिल या चित्रपटात दिसणार आहे, ज्याची चाहत्यांना उत्सुकता आहे.

# क्या जस्टिस पाल को भारत रत्न मिलना चाहिए?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जिसे जापान अपना 'भगवान' मानता है, उसे भारत भूल गया! जापान के टोक्यो में एक भारतीय की मूर्ति लगी है और वहां के स्कूलों में उनके बारे में पढ़ाया जाता है? लेकिन दुख की बात है कि हमारे देश में ९९% लोग उनका नाम तक नहीं जानते।कहानी एक ऐसे 'शेर' की जिसने पूरी दुनिया के सामने दहाड़ कर न्याय किया था! वह दिन था १२ नवंबर, १९४८ टोक्यो के बाहरी इलाके में एक विशाल बगीचेवाले घर में टोक्यो ट्रायल चल रहा है। द्वितीय विश्वयुद्ध में हारने के बाद, जापान के तत्कालीन प्रधान मंत्री तोजो सहित ५५ जापानी युद्धबन्दियों के मुकदमे की सुनवाई हो रही थी

इनमें से २८ लोगों की पहचान क्लास-ए (शांतिभंग का अपराध) युद्ध अपराधियों के रूप में की गई है। यदि सिद्ध हो जाता है, तो एकमात्र सजा 'मृत्युदण्ड' थी

दुनिया के ११ दिग्गज जज बैठे थे। जिनमें से एक जज भारतीय था। अमेरिका और ब्रिटेन का दबाव था। १० जजों ने एक सुर में कहा "जापान के कैदियों को फांसी दो!" दुनिया भर से चुने गए अंतर्राष्ट्रीय न्यायाधीश ...... 'दोषी' की घोषणा कर रहे हैं .... 'दोषी' ...... 'दोषी' .........

लेकिन तभी एक गूँज उठी 'नॉट गिल्टी' (दोषी नहीं!) दालान में सन्नाटा छा गया। यह दहाड़ एक भारतीय की थी जस्टिस राधा बिनोद पाल!

१८८६ में पूर्वी बंगाल के कुंभ में उनका जन्म हुआ। उनकी माँ ने अपने घर और गाय की देखभाल करके जीवन यापन किया। बालक राधा बिनोद गांव के प्राथमिक विद्यालय के पास ही गाय को चराने ले जाता था।

जब शिक्षक स्कूल में पढ़ाते थे, तो राधा बाहर से सुनता था। एक दिन स्कूल इंस्पेक्टर शहर से स्कूल का दौरा करने आये। उन्होंने कक्षा में प्रवेश करने के बाद छात्रों से कुछ प्रश्न पूछे। सब बच्चे चुप थे। राधा ने कक्षा



की खिड़की के बाहर से कहा .... "मुझे आपके सभी सवालों का जवाब पता है।" और उसने एक-एक कर सभी सवालों के जवाब दिए। इंस्पेक्टर ने कहा ... "अद्भुत! .. आप किस कक्षा में पढ़ते हो ?"

जवाब आया, "... मैं नहीं पढ़ता ... मैं यहां एक गाय को चराता हूं।"

जिसे सुनकर हर कोई हैरान रह गया। मुख्याध्यापक को बुलाकर, स्कूल निरीक्षक ने लड़के को स्कूल में प्रवेश लेने के साथ-साथ कुछ छात्रवृत्ति प्रदान करने का निर्देश दिया।

इस तरह राधा बिनोद पाल की शिक्षा शुरू हुई। फिर जिले में सबसे अधिक अंकों के साथ स्कूल फाइनल पास करने के बाद, उन्हें प्रेसीडेंसी कॉलेज में भर्ती कराया गया। एम.एस्सी. गणित होने के बाद कोलकाता विश्वविद्यालय से, उन्होंने फिर से कानून का अध्ययन किया और डॉक्टरेट की उपाधि प्राप्त की। दो चीजों के विपरीत चुनने के संदर्भ में उन्होंने एक बार कहा था, "कानून और गणिता सब के बाद इतने अलग नहीं हैं।"

फिर से वापस आ रहा है... अंतर्राष्ट्रीय न्यायालय टोक्यो।

बाकी न्यायाधीशों के प्रति अपने ठोस तर्क में उन्होंने संकेत दिया कि मित्र राष्ट्रों (द्वितीय विश्व युद्ध के विजेता) ने भी संयम और अंतरर्राष्ट्रीय कानून की तटस्थता के सिद्धांतों का उल्लंघन किया है। जापान के आत्मसमर्पण के संकेतों को अनदेखा करने के अलावा, उन्होंने परमाणु बमबारी का उपयोग कर लाखों निर्दोष लोगों को मार डाला।

राधा बिनोद पाल द्वारा बारह सौ बत्तीस पृष्ठों पर लिखे गए तर्क को देखकर न्यायाधीशों को क्लास-ए से बी तक के कई अभियुक्तों को छोड़ने के लिए मजबूर किया गया था। इन क्लास-बी युद्ध अपराधियों को एक निश्चित मौत की सजा से बचाया गया था। अंतर्राष्ट्रीय अदालत में उनके फैसले ने उन्हें और भारत को विश्व प्रसिद्ध प्रतिष्ठा दिलाई।

जापान इस महान व्यक्ति का सम्मान करता है। १९६६ में सम्राट हिरोहितो ने उन्हें देश के सर्वोच्च नागरिक सम्मान 'कोक्को कुनासाओ' से सम्मानित किया। टोक्यो और क्योटो में दो व्यस्त सड़कों का नाम उनके नाम पर रखा गया है। उनके निर्णय को कानूनी पाठ्यक्रम में भी शामिल किया गया है। टोक्यो की सुप्रीम कोर्ट के सामने उनकी प्रतिमा लगाई गई है। २००७ में, प्रधान मंत्री शिंजो आबे ने दिल्ली में उनके परिवार के सदस्यों से मिलने की इच्छा व्यक्त की और वे उनके बेटे से मिले।

डॉ. राधा बिनोद पाल (२७ जनवरी १८८६ - १० जनवरी १९६७) का नाम जापान के इतिहास में याद किया जाता है। जापान के टोक्यो में, उनके नाम एक संग्रहालय और यासुकुनी मंदिर में एक मूर्ति है।

उनके नाम पर जापान विश्वविद्यालय का एक शोध केंद्र है। जापानी युद्ध अपराधियों पर उनके फैसले के कारण, चीनी लोग उनसे नफरत करते हैं।

वे कानून से संबंधित कई पुस्तकों के लेखक हैं। भारत में लगभग कोई भी उन्हें नहीं जानता है और शायद उनके पड़ोसी भी उन्हें नहीं जानते हैं! इरफान खान अभिनीत टोक्यो ट्रायल्स पर एक हिंदी फिल्म बनाई गई थी, लेकिन उस फिल्म ने कभी सुर्खियां नहीं बटोरीं।

बहुत सारे अंडररेटेड और अज्ञात भारतीयों में से एक।

क्या आपको लगता है जस्टिस पाल को भारत रत्न मिलना चाहिए

# कोथळीगड मुघलांना जिंकणे का होते अवघड?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोथळीगड कर्जतजवळ डोंगरमाथ्यावर वसलेला आहे. भोवती खोल दऱ्या आणि घनदाट जंगलामुळे तो सुरक्षित राहतो. यामुळे शत्रूची हालचाल आधीच लक्षात येत असे.

**किल्ल्याची अनोखी रचना**

हा किल्ला एका उंच सुळक्यावर बांधलेला आहे. गडावर जाण्यासाठी आतून कोरलेल्या पायऱ्या आहेत. ही रचना शत्रूसाठी मोठा अडथळा ठरते.

**प्रवेशमार्ग**

गडावर जाण्यासाठी एकच अरुंद वाट आहे. मोठ्या सैन्याला एकाच वेळी चढणे अशक्य होते. यामुळे थोड्या सैनिकांनीही गड रक्षण शक्य होते.

**गुप्त मार्ग**

किल्ल्यात काही गुप्त मार्ग असल्याचे उल्लेख आहेत. यांचा उपयोग आपत्कालीन परिस्थितीत केला जायचा. यामुळे गडावर अचानक हल्ला करणे कठीण होते.

**पाण्याची व्यवस्था**

गडावर पाण्याच्या टाक्या कोरलेल्या आहेत. त्या वर्षभर पाणी साठवण्यासाठी उपयोगी ठरतात. यामुळे जास्त काळ वेढा सहन करता येत होता.

**शिवाजी महाराजांसाठी महत्त्वाचा किल्ला**

हा गड नजर ठेवण्यासाठी महत्त्वाचा होता. कोंकण आणि डोंगर भागातील हालचाली याठिकाणाहून दिसत होत्या. यामुळे रणनीती आखणे सोपे होत होते.

**मुघलांसाठी कठीण आव्हान**

मुघल सैन्य मोठ्या संख्येने लढत असे. पण याठिकाणी अरुंद वाटेमुळे त्यांची ताकद कमी पडत होती.

**नैसर्गिक संरक्षण**

किल्ल्याभोवती उंच कडे आणि खोल दऱ्या आहेत. हे नैसर्गिक किल्लेप्रमाणेच संरक्षण देतात. त्यामुळे शत्रूला चढाई करणं अत्यंत कठीण होते.

# १५ ते २० हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून सुरू केला व्यवसाय!

## 'टफ मफ अँड कंपनी' डेजर्ट क्लाउड किचन

**सक्सेस स्टोरी**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिल्लीतील २० वर्षांची रिधिमा नागपाल सध्या आपल्या अनोख्या व्यवसायामुळे चर्चेत आहे. न्यूयॉर्क सिटीच्या एका प्रवासातून तिला मिळालेल्या कल्पनेने तिचे आयुष्यच बदलून टाकले. त्या अनुभवातून प्रेरणा घेत रिधिमाने नोव्हेंबर २०२५ मध्ये 'टफ मफ अँड कंपनी' या प्रीमियम डेजर्ट क्लाउड किचनची सुरूवात केली. अमेरिकन स्टाईल जाड आणि चंकी कुकीज तसेच विविध स्वादिष्ट डेजर्ट तयार करणाऱ्या या व्यवसायातून तिने अवघ्या तीन महिन्यांत सुमारे आठ लाख रुपयांची कमाई केली आहे.

रिधिमाचा जन्म आणि संगोपन दिल्लीमध्येच झाला. तिने २०२३ मध्ये रायन इंटरनॅशनल स्कूलमधून शिक्षण पूर्ण केले. सध्या ती दिल्ली विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ओपन लर्निंगमधून मानसशास्त्र विषयात बी.ए. (ऑनर्स) करत असून दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. लहानपणी अवघ्या १३ व्या वर्षी आईसोबत न्यूयॉर्कला गेलेल्या प्रवासात तिने वेगळ्या प्रकारच्या डेजर्ट संस्कृतीचा अनुभव घेतला. याच अनुभवाने पुढे तिच्या व्यवसायाच्या कल्पनेला आकार दिला.

पुढे शिक्षणासोबतच रिधिमाने ऑगस्ट २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या काळात नवी दिल्लीतील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कुलिनरी आर्ट्स येथे १५ महिन्यांचा प्रोफेशनल कुकिंग कोर्स पूर्ण केला. या काळात तिने ब्रिटनच्या सिटी अँड गिल्ड्सकडून पेस्ट्री शेफ आणि बेकर म्हणून प्रमाणपत्र मिळविले, तसेच पॅरिसमधील वर्ल्ड असोसिएशन ऑफ शेफ्स सोसायटीकडूनही प्रमाणपत्र मिळविले.

रिधिमाच्या आजी बेकिंगमध्ये पारंगत होत्या. त्यांच्या निधनानंतर आजोबांनी त्यांची हस्तलिखित रेसिपी डायरी रिधिमाला दिली. त्या रेसिपींच्या आधारे रिधिमाने पुन्हा बेकिंगचा प्रयोग सुरू केला. सुरूवातीला अनेक प्रयत्न अपयशी ठरले, मात्र तिने हार न मानता सतत प्रयोग करत स्वतःची पद्धत विकसित केली. न्यूयॉर्कमधील डेजर्ट संस्कृतीची प्रेरणा आणि आजीच्या पारंपरिक चवी यांचा मिलाफ करत तिने २०२२ मध्ये स्वतःची होम बेकरी सुरू केली.

या होम बेकरीसाठी सुरुवातीला तिने वडिलांकडून मिळालेल्या १५ ते २० हजार रुपयांच्या गुंतवणुकीत व्यवसाय सुरू केला. सोशल मीडियावर इंस्टाग्राम पेज तयार करून तिने आपल्या उत्पादनांची मार्केटिंग केली. पुढे नोव्हेंबर २०२५ मध्ये 'टफ मफ अँड कंपनी' या क्लाउड किचनची स्थापना केली. सध्या या ब्रँडमधून जाड अमेरिकन स्टाईल कुकीज, ब्राउनी, कुकी पिझ्झा, पॅनकेक, बटर केक आणि विविध डेजर्टची विक्री केली जाते. या व्यवसायातून तिने अवघ्या तीन महिन्यांत जवळपास आठ लाख रुपयांची कमाई करत अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी




एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# प्रपंचात खरी विश्रांती नामस्मरणातच!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

काही न करणे, आपण काही करीत आहोत किंवा आपल्याला काही करावयाचे आहे असे न वाटणे, हाच परमार्थ. पण स्वस्थ बसायला लावणे ही तुरुंगात मोठी शिक्षा समजतात. देहाने, मनाने, एकसारखी चळवळ करण्याची आपल्याला सवय लागली आहे. देहाला स्वस्थ बसायला लावणे कठीण, मनाला स्वस्थ बसायला लावणे त्यापेक्षा कठीण, आणि देह कर्म करीत असताना मनाला स्वस्थ बसविणे हे अत्यंत कठीण. मनाला खरे म्हटले तर स्वास्थ्य हवे. पण ते मिळविण्याकरिता साधन करणे, म्हणजे प्रयत्न करणे, जरूर आहे. मनाचे स्वास्थ्य बिघडायला कारणे काय ती पाहू. पहिले, आपल्या इच्छेविरुद्ध गोष्ट होणे; दुसरे, आपल्या मागच्या बऱ्या-वाईट कर्मांची आठवण होणे; आणि तिसरे, उद्याची काळजी करणे. जो तो आपल्या इच्छेप्रमाणे व्हावे असे म्हणणार; सर्वजण तुमच्याच इच्छेप्रमाणे कसे वागतील ? तुमच्या इच्छेविरुद्ध गोष्टी होणारच. तेव्हा स्वास्थ्य बिघडू न द्यायला, आपली इच्छाच नाहीशी करावी. कोणतीही वस्तू मिळावी ही बुद्धी नाही ठेवू. हाव सोडावी. लोकांची आस सोडावी. अभिमान सोडून कर्म करीत राहावे. प्रयत्न करून यश आले नाही म्हणजे दुःख होते, स्वास्थ्य बिघडते; मी



केलेच नाही म्हटले म्हणजे कुठले दुःख? प्रयत्न करून जे काही होते ते रामाच्या इच्छेने झाले म्हणावे. प्रत्येक गोष्ट रामाने केली म्हणणे म्हणजे भगवंताच्या अखंड अनुसंधानात राहणे. हे साधण्यासाठी अखंड नामस्मरण करावे. जे झाले, जे होते आहे, आणि जे होईल, ते भगवंताचेच आपल्या हिताकरिता करणे आहे, आपण कर्ते नाही, असे मानणे, याला अखंड भगवन्नामस्मरण पाहिजे. सारांश- जे जे काही झाले, ते ते भगवंतानेच आपल्या हिताकरिता केले. उद्याची काळजी भगवंतालाच आहे, त्याला काय योग्य वाटेल ते तो करील. म्हणून झाल्याची म्हणजे कालची आठवण करू नये, होणाऱ्याची म्हणजे उद्याची काळजी करू नये, आणि चालू क्षण वाया जाऊ देऊ नये, नामस्मरणात राहावे. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे.

आहे त्या परिस्थितीत समाधान नसणे हा जो देहबुद्धीचा स्वभाव तो आपण सगळीकडे लावतो. सर्व गोष्टींचे ज्ञान होत नाही तोपर्यंत आपण काही करणार नाही, असे आपण म्हणतो; सर्व गोष्टींचे ज्ञान मरेपर्यंत आपल्याला होत नाही, आणि आपण काही करीत नाही. देहबुद्धी आपल्याला भगवंताचा विसर पाडते. या देहबुद्धीवर आपण नामाच्या मंत्राचे पाणी शिंपडू या म्हणजे तिची वाढ होणार नाही. मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे आणि देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात.

# आध्यात्मिक महत्त्व, वैशिष्ट्ये आणि व्रताचे कारण काय?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू धर्मात प्रत्येक तिथीचे स्वतंत्र धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व आहे. त्यापैकी अनंग त्रयोदशी ही विशेषतः दाम्पत्य जीवन, प्रेम आणि सौख्याशी संबंधित मानली जाणारी पवित्र तिथी आहे. चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील त्रयोदशीला अनंग त्रयोदशी साजरी केली जाते आणि ही तिथी भगवान शिव, माता पार्वती तसेच कामदेव यांच्या पूजेशी निगडित आहे.

**अनंग त्रयोदशी म्हणजे काय?**

'अनंग' हा शब्द कामदेवाचे एक नाव आहे. 'अनंग' म्हणजे शरीर नसलेलापुराणकथेनुसार भगवान शिवांनी कामदेवाला भस्म केल्यानंतर त्याला 'अनंग' असे संबोधले गेले. या तिथीला कामदेवाची पूजा करून प्रेम, आकर्षण आणि वैवाहिक सौख्य वृद्धिंगत करण्यासाठी प्रार्थना केली जाते.

## अनंग त्रयोदशी विशेष

**अनंग त्रयोदशीचे महत्त्व**

अनंग त्रयोदशीला धार्मिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या मोठे महत्त्व आहे.

**दाम्पत्य जीवनासाठी विशेष फलदायी**

हे व्रत केल्याने पती-पत्नीमधील मतभेद दूर होतात आणि वैवाहिक जीवन आनंदी होते.

**प्रेमसंबंध दृढ होतात**

प्रेमीयुगुलांसाठी ही तिथी अत्यंत शुभ मानली जाते. परस्पर समज आणि आकर्षण वाढते.

**भगवान शिवाची कृपा प्राप्त होते**

त्रयोदशी ही भगवान शिवाची प्रिय तिथी असल्याने या दिवशी शिवपूजा केल्यास विशेष पुण्य मिळते.

**मनोकामना पूर्ण होण्याची श्रद्धा**

या दिवशी केलेल्या व्रत-पूजेमुळे जीवनातील अडथळे दूर होतात व इच्छित फल प्राप्त होते.

**अनंग त्रयोदशीची वैशिष्ट्ये**

ही तिथी प्रदोष व्रताशी अनेकदा जोडलेली असते. त्यामुळे शिवपूजेला विशेष महत्त्व असते. कामदेव आणि रती यांचे पूजन करून सौंदर्य, आकर्षण आणि प्रेम वृद्धिंगत करण्याचा संकल्प केला जातो. सायंकाळच्या प्रदोषकाळात दीप प्रज्वलित करून शिव-पार्वतीची आराधना केली जाते.

**हे व्रत का केले जाते?**

अनंग त्रयोदशी व्रतामागे धार्मिक व जीवनोपयोगी अशी दोन्ही कारणे आहेत.

- वैवाहिक जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी
- सौख्य, प्रेम आणि कुटुंबातील एकता वाढविण्यासाठी
- आध्यात्मिक शांती आणि सकारात्मक ऊर्जा मिळविण्यासाठी
- भगवान शिव व कामदेव यांच्या कृपेने आकर्षण व व्यक्तिमत्त्व वृद्धीसाठी

अनंग त्रयोदशी हे केवळ धार्मिक व्रत नसून मानवी जीवनातील प्रेम, समजूतदारपणा आणि नात्यांची दृढता यांचे प्रतीक आहे. आधुनिक धकाधकीच्या जीवनात नात्यांमध्ये येणारा ताण कमी करून परस्पर प्रेम वाढविण्याचा संदेश या व्रताद्वारे



दिला जातो. त्यामुळेच अनंग त्रयोदशीला आध्यात्मिकतेसोबतच सामाजिक दृष्टिकोनातूनही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# उपासना व उपासकाच्या जीवनात मंत्रांना महत्त्व

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

।। काही संकीर्ण मंत्र।।

**(१)** अन्नाचा दृष्टिदोष घालवण्याचा मंत्र (एकदाच म्हणावा)
अन्नं ब्रह्म रसो विष्णूर्भोक्ता देवो महेश्वराः।
इति संचित्यं भुंजानं दृष्टी दोषो न बाधते।।

**(२)** जेवणास सुरूवात करण्या आधी म्हणावयाचा मंत्र
अन्नपूर्णे सदापूर्णे शंकर प्राण वल्लभे। ज्ञान वैराग्य सिदध्यर्थं भिक्षां देहि च पार्वती।।

**(३)** जेवणापूर्वी म्हणण्याचा असाच एक गीतेतील श्लोक
ब्रम्हार्पणं ब्रम्ह हविः ब्रम्हाग्नौ ब्रम्हणाहुतम्।
ब्रम्हैव तेन गंतव्य ब्रम्ह कर्म समाधिना।।

**(४)** नेत्र विकार होऊ नयेत म्हणून जेवण झाल्यावरचा मंत्र
स्वर्यातिंच सुकन्यांच च्यवनं शक्रमश्विनौ।
भोजनान्ते स्मरेद यस्तु तस्य चक्षुर्न हीयते।।
(हात धुतल्यावर ओल्या हाताने दोन्ही डोळ्यांवर अल्प घर्षण करून पाणी लावावे, नेत्र चांगले राहतात)

**(५)** भोजन झाल्यावर योग्य रीतीने अन्न पचन व्हावे म्हणून जेवणानंतर मंत्र म्हणत पोटावरून हात फिरवावा.
अगस्त्यं कुंभकर्णं च शनिं च वडवानलं। आहार प्रति पाकार्थम् स्मरामि च वृकोदरम्।।
अतापि भक्षितो येन वातापीच महाबलः। अगस्तस्य प्रसादेन भोजनं मम जीर्यताम्।। (श्रद्धा हवी तर या मंत्रांचा अनुभव येतो)

**(६)** लहान मुलांना नजर, दृष्ट लागते त्यावर मंत्र
अंजनी गर्भ संभूतं कुमारं ब्रम्हचारिणम्।
दृष्टी दोष विनाशाय हुनुमंतं स्मराम्यहम्।।

**(७)** मृत्युसमयी जे अनाथ असतात, ज्यांचे श्राद्ध कोणी करीत नाही, अशांचे सर्वत्र आत्मस्वरूप एक आहे या करुणामय भावनेने, दुर्लक्षित असा मृतांना अन्नदान करण्याचा मंत्र
(हा मंत्र अनंत पुण्य मिळवून देतो) श्राद्ध पक्षाच्या महिन्यात अमावास्येला, एका पत्रावळीवर अन्न घराबाहेर ठेवून हात जोडून खालील मंत्र म्हणावा.
येषां न माता न पिता न बंधुनैवान्नसिद्धिर्न यथान्नमस्ति।
तत् तृप्त यन्नं भुविदत्त मेतत् प्रयान्तु तृप्तीं मुदिता भवन्तु।।

**(८)** गाढ निद्रा येण्यासाठी, झोपताना खालील मंत्र म्हणावा
अगस्तीर्माधवश्चैव मुचकुन्दो महाबलः।
कपिलो मुनि रास्तिकः पंचैते सुख शायिनः।

**(९)** वाईट स्वप्ने पडू नयेत या साठीचा मंत्र
(झोपण्या अगोदर म्हणावा)
अच्युतं केशवं विष्णुं हरि सोम जनार्दनम्।
हंसं नारायणं कृष्णं जपेत् दुःस्वप्न शान्तये।।

**(१०)** घराबाहेर पडल्यानंतर, घरी परत येईपर्यंत रक्षण व्हावे यासाठी मंत्र.
वनमाली गदी शारंगी शंखी चक्रीय नन्दको।
श्रीमान् नारायणो विष्णूर्वासुदेवो भिरक्षतु।।

**(११)** मंत्र जप, पूजा, पारायण, नामस्मरण करताना आळस कंटाळा येतो तेंव्हा खालील मंत्र म्हणावा.
इंद्रनीळ रंग राम शामधाम योगिया। नामपूर्ण काम सार पार भव रोगीया।। (श्री समर्थ रामदास)

**(१२)** श्रीमत् वासुदेवानंद सरस्वतींनी श्री मारूतीचा स्मरणमंत्र संध्याकाळी दिवा लावताना म्हणावा असे सांगितले आहे तो मंत्र.
अंजनी सूता रूद्रावतारा। जय रामदूता भव भय सारा नरसिंह मूर्ते। जय हतभीते।। (या मंत्राने संध्याकाळी दिवे लागणीच्या वेळी घरात दुष्ट शक्ती येत नाहीत)

**(१३)** विवाहितेला किंवा कोणत्याही स्त्रीला घरी मानसिकशारिरिक त्रास होत असेल तेंव्हा खालील मंत्रविधी करावा, कष्ट जातात
दुर्गाआईचा फोटो समोर ठेवून आपल्या वयाच्या दुप्पट जप करावा. उदा. ४० वय असेल तर ८० जप करावा. १०८ केल्यास उत्तमच.
सृष्टीदेवी नमस्तुभ्यं अखिलानंद दायिनी।
सौख्यकर्ती दुःखहर्ती महादेवी नमोस्तुते।।
(जप झाल्यावर डोळे मिटून शक्य तितकी मनात देवीची प्रतिमा स्थिरवावी, म्हणजेच देवीचे कळकळून ध्यान करावे, सर्व कष्ट जाऊन, आनंदी वातावरण घरात निर्माण होते)

**(१४)** कोणत्याही जपा अगोदर किंवा मंत्रोपासना नसेल तरीही नित्य म्हणजे रोजच सर्व उपासनेच्या अगोदर श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती प्रणित 'चित्त स्थैर्यकरं स्तोत्रम्' हे सहा श्लोकाचे स्तोत्र म्हणावेच.

**(१५)** त्रिविध ताप (त्रिविध दुःख) दूर करून मनाला सुख शांति देणारे श्रीमत् वासुदेवानंदांचे 'शान्ति स्तोत्रम्'चे ९०० पाठ अवश्य करावेत. अत्यंत अनुभव सिद्ध स्तोत्र आहे.

# प्रभू श्रीरामांचा आवडता मूलांक कोणता?

## कोणत्या भक्ताला मिळतो रघुपतींचा कृपाशीर्वाद?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अंकशास्त्रानुसार प्रभू श्रीरामांचा आवडता मूलांक ९ मानला जातो आणि या अंकात धर्मनिष्ठा आणि पराक्रमाचे विशेष गुण दडलेले आहेत. हिंदू धर्मात भगवान श्रीराम यांचा जन्मोत्सव म्हणून साजरी होणारी श्रीराम नवमी ही केवळ धार्मिकच नव्हे, तर अंकशास्त्रीयदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अंकशास्त्रानुसार प्रभू श्रीरामांचा आवडता मूलांक ९ मानला जातो आणि या अंकात धर्मनिष्ठा आणि पराक्रमाचे विशेष गुण दडलेले आहेत.

**प्रभू श्रीरामांचा आवडता मूलांक ९ का मानला जातो?**

अंकशास्त्रानुसार श्रीराम नवमी हा सण चैत्र शुक्ल पक्षातील नवमी तिथीला येतो. 'नवमी' म्हणजेच अंक ९, जो पूर्णत्व, त्याग आणि धर्मपालन यांचे प्रतीक मानला जातो.

असे मानले जाते की अंक ९ हा ग्रह श्री मंगळग्रहाच्या प्रभावाखाली असतो. श्री मंगळग्रह धैर्य, शौर्य आणि निर्णयक्षमता यांचे प्रतिनिधित्व करतो - हेच गुण प्रभू श्रीरामांच्या जीवनात स्पष्टपणे दिसून येतात.

**मूलांक ९ असलेल्या लोकांवर श्रीरामांची विशेष कृपा?**

ज्या व्यक्तींचा जन्म ९, १८ किंवा २७ तारखेला झाला आहे त्यांचा मूलांक ९ मानला जातो.

**अंकशास्त्रानुसार अशा लोकांमध्ये पुढील गुण आढळतात.**

- धर्म आणि सत्यासाठी उभे राहण्याची ताकद
- नेतृत्व करण्याची क्षमता
- इतरांना मदत करण्याची प्रवृत्ती
- संकटात शांत आणि धैर्याने निर्णय घेण्याची क्षमता
- समाजासाठी काहीतरी करण्याची तीव्र इच्छा असे मानले जाते, की मूलांक ९ असलेल्या व्यक्तींवर प्रभू श्रीरामचंद्र यांची विशेष कृपा राहते. ज्यामुळे त्यांना कठीण परिस्थितीत योग्य मार्ग मिळण्यास मदत होते.

अंकशास्त्रात ९ हा शेवटचा एक अंकी अंक असल्यामुळे तो पूर्णत्व आणि समर्पण यांचे प्रतीक मानला जातो. हा अंक व्यक्तीला अहंकार सोडून समाज आणि धर्मासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो.

प्रभू श्रीरामांचे जीवन देखील त्याग, कर्तव्य आणि धर्मपालन यांचे उत्तम उदाहरण मानले जाते. म्हणूनच श्रीराम नवमीच्या दिवशी अंक ९ ला विशेष महत्त्व दिले जाते.

अंकशास्त्रानुसार प्रभू श्रीराम यांचा प्रिय मूलांक ९ धर्म, पराक्रम आणि त्यागाचे प्रतीक असल्याने या दिवशी त्याच्या उर्जेशी स्वतःला जोडणे हे आध्यात्मिक प्रगतीसाठी लाभदायक ठरू शकते.



# शिव महापुराणानुसार वायवीय संहिता

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जपाच्या शक्तीचे आणि प्रकारांचे (उत्तर भाग) मध्ये सखोल वर्णन केले आहे. यात भगवान शिव स्वतः पार्वती मातेला जपाचे महत्त्व आणि त्याच्या विविध स्तरांमधील ऊर्जेविषयी सांगतात.

**जपाचे प्रकार आणि त्यांची शक्ती**

वायवीय संहितेत जपाचे प्रामुख्याने पाच प्रकार सांगितले आहेत, ज्यांची शक्ती उत्तरोत्तर वाढत जाते.

**वाचिक जप :** मंत्र मोठ्याने किंवा ओठांची हालचाल करून म्हणणे. याचे फळ सामान्य मानले जाते.


**उपांशू जप :** मंत्र इतक्या हळू आवाजात म्हणणे की तो फक्त स्वतःलाच ऐकू येईल. याचे फळ वाचिक जपापेक्षा १०० पटींनी जास्त असते.

**मानस जप :** ओठांची हालचाल न करता केवळ मनातल्या मनात मंत्राचे उच्चारण करणे. याचे फळ वाचिक जपापेक्षा १००० पटीने अधिक असते.

**सगर्भ जप :** प्राणायाम आणि ध्यानासह केलेला जप. हा मानस जपापेक्षाही १०० पटीने अधिक प्रभावशाली मानला जातो.

**अगर्भ जप :** हा जपाचा उच्चतम स्तर असून, यात साधक पूर्णपणे मंत्राशी एकरूप होतो.

**वायवीय संहितेनुसार**



**जपाचे महत्त्व**

**पंचाक्षरी मंत्राची शक्ती :** या संहितेत 'ॐ नमः शिवाय' या पाच अक्षरी मंत्राला महामंत्र म्हटले आहे. शुद्ध अंतःकरणाने याचा जप केल्यास सर्व दुःखांतून मुक्ती आणि मोक्ष प्राप्त होतो.

**संरक्षण आणि सिद्धी :** मंत्राचा सतत जप केल्याने साधकाच्या भोवती एक सकारात्मक ऊर्जा तयार होते, जी त्याचे संकटांपासून संरक्षण करते आणि आध्यात्मिक सिद्धी प्राप्त करून देते.

**प्रणव (ॐ) जप :** वायवीय संहितेनुसार, 'ॐ' हा शिवाचे प्रतीक असून त्याचा जप केल्याने ब्रह्मप्राप्ती होते.

**मानसिक आणि शारीरिक परिणाम :** मंत्रांच्या उच्चारणामुळे होणाऱ्या ध्वनी लहरींचा शरीर आणि मनावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे मानसिक स्थिरता वाढते

# घरात धावणाऱ्या ७ घोड्यांचे फोटो कोणत्या दिशेला लावतात?

## आपणाकडे आकर्षित होईल सुख आणि समृद्धी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

वास्तुशास्त्रानुसार घरातील प्रत्येक वस्तू आणि भिंतीवरील प्रत्येक फोटो लावण्याचा आपल्या जीवनावर सकारात्मक किंवा नकारात्मक प्रभाव पडत असतो. सर्वांत प्रभावी प्रतिकांपैकी एक म्हणजे सात धावणाऱ्या घोड्यांचे फोटो. अनेकदा लोक याला केवळ एक सजावटीची वस्तू मानतात, परंतु वास्तुशास्त्रानुसार हा फोटो यश, शक्ती, धैर्य आणि प्रगतीचे प्रतीक आहे. जर आपणासही आपल्या करिअर किंवा व्यवसायात जलद प्रगती हवी असेल, तर घरामध्ये या घोड्यांचे फोटो लावण्याची योग्य दिशा आणि नियम नक्की काय आहेत ते जाणून घेऊया...



**७ हा अंक आणि घोड्यांचे महत्त्व का आहे?**

हिंदू धर्म आणि अंकशास्त्रामध्ये ७ हा अंक अत्यंत शुभ मानला जातो. जसे की सप्तर्षी, इंद्रधनुष्याचे सात रंग. त्याचबरोबर घोडा सौर उर्जेचे प्रतीक आहे आणि त्याचा संबंध सूर्याच्या रथाशीही जोडला जातो. धावणारे घोडे जीवनातील अदम्य यशाचे प्रतीक मानले जातात.

**धावणाऱ्या ७ घोड्यांचे फोटो घरात कोणत्या दिशेला लावावे?**

पूर्व : जर करिअरमध्ये प्रगती आणि समाजात आदर हवा असेल, तर हे फोटो आपल्या घराच्या पूर्व दिशेकडील भिंतीवर लावा. यामुळे सरकारी कामात यश आणि आदर मिळेल.

दक्षिण : व्यवसायात ओळख मिळविण्यासाठी हे फोटो दक्षिण दिशेकडील भिंतीवर लावा. यामुळे कार्यस्थळी आपला अधिकार प्रस्थापित होईल.

उत्तर : जर आर्थिक समृद्धी आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत हवे असतील, तर उत्तर दिशेला हा फोटो लावू शकता.

**फोटो लावताना हे ५ नियम लक्षात ठेवा**

- घोड्यांचे तोंड नेहमी घराच्या आतल्या बाजूला असले पाहिजे. जर त्यांचे तोंड मुख्य दरवाजाकडे असेल, तर संपत्ती आणि संधींचा ओघ बाहेर पडेल.
- फोटोमधील घोडे आक्रमक किंवा धमकी देणारे दिसता कामा नयेत. त्यांचे चेहरे आनंदी आणि उत्साही असावेत.
- घोड्यांचे फोटो पूर्ण असावेत. पाय कापलेले किंवा अपूर्ण चित्र वास्तूदोष निर्माण करते.
- नेहमी लगाम न घालता मोकळेपणाने धावणाऱ्या घोड्यांचे फोटो निवडा. लगामाने बांधलेले घोडे अडथळ्याचे प्रतीक मानले जातात.
- फोटोच्या मागे उगवता सूर्य किंवा मोकळी मैदाने असलेले चित्र अधिकच शुभ मानले जाते. फोटोमध्ये घोड्यांना पाण्यातून किंवा चिखलातून धावताना कधीही दाखवू नये.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)